ePaper

**लालकृष्ण अडवाणी, मंत्री जयशंकर अन् निवडणूक आयुक्तांनाच SIR ची नोटीस**



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™




चाकणमध्ये कोट्यवधींचा गुटखा जप्त

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 21 सप्टेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## मिमिक्रीच्या मुद्द्यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा खोचक टोला

# राहुल गांधींमुळे पार्टी बेरोजगार

**महाईन्यूज । नागपूर**

**राहुल गांधींच्या 'छात्रो की गूंज'मध्ये पंतप्रधान मोदींची मिमिक्री करण्यात आली. यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्यावर टीका केली आहे. मला असं वाटतं की आता राहुल गांधींना हेच काम उरलं आहे. राहुल गांधींनी स्टँड अप कॉमेडीचं काम हाती घ्यावं. तिथे मिमिक्री केली तर त्यांना खूप चांगल्या प्रकारचा रोजगार मिळू शकेल. इथे तर त्यांनी त्यांच्या पार्टीला बेरोजगार करुन ठेवल्याचा टोला मुख्यमंत्र्यांनी लगावला. ते नागपूरमध्ये बोलत होते.**





युपीआय पेमेंटवरील शुल्काला पेट्रोल पंप चालकांनी विरोध सुरू केला आहे. 2000 रुपये अथवा त्यापेक्षा अधिक युपीआय पेमेंट ते स्वीकारणार नाही. ग्राहकांकडून रोख रक्कम स्वीकारली जाईल, अशी भूमिका पेट्रोल पंप चालकांनी घेतली आहे. यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. युपीआयवरील शुल्क वाढीविरोधात पेट्रोल पंपचालकांनी 15 ऑक्टोबरपासून 2000 च्या वर युपीआय पेमेंट घेणार नाही, अशी भूमिका घेणं अयोग्य आहे. शेवटी युपीआयमुळे त्यांचा व्यवसाय वाढला आहे, त्यांचे व्यवहार पारदर्शक झाले आहेत असे मुखंत्री म्हणाले. ते नागपूरमध्ये बोलत होते.

लोक युपीआयचा त्याचा मोठ्याप्रमाणावर वापर करत आहेत. अशावेळी अतिश्य माफक शुल्क आकारले जाणार आहे. हे शुल्क लावत असताना संसदीय समितीने त्याची शिफारस केली. या समितीमध्ये पी. चिदंबरम यांच्यासह काँग्रेसचे चार मोठे नेते होते. या समितीने हे शुल्क लावायला लावले आहे. सगळ्या व्यवहारांवर हे शुल्क नाही. काही विशिष्ट व्यवहारांवरच हे शुल्क आहे. तरीही एकप्रकारे नरेटिव्ह तयार करण्याचा प्रयत्न होत आहे. आज आपला व्यवहार वाढण्यामागे आणि भ्रष्टाचार कमी होण्यात युपीआय आणि डिजिटल व्यवहारांचा वाटा आपण लक्षात घेतला पाहिजे असे मुख्यमंत्री म्हणाले.

आज आपण सगळे अवादा मध्ये आहोत. ही सोलर मॉड्युल बनवणारी सगळ्यात मोठी सुपर फॅक्टरी तयार करण्यात आली आहे. एवढे ॲडव्हान्स इंटिग्रेशन कुठेही नाही, सगळ्यात स्मार्ट मॉड्युल्स या फॅक्टरी तयार होत आहेत. एक प्रकारे देशाला सोलरच्या क्षेत्रात चीनसोबत स्पर्धा करुन पुढे नेण्याचे काम होत आहे. 2024 साली भूमिपूजन झाले आणि आज 5 हजार कामगार काम करत आहेत. अवडाच्या सोलर मॉड्युलला मागणी आहे. एक प्रकारे बदलणाऱ्या महाराष्ट्र, विदर्भ आणि नागपूरच्या इकोसिस्टम चे सगळ्यात मोठे उदाहरण आहे. आणखी विस्तार करत आहेत असे ते म्हणाले.

मुंबईसाठी आपण योजना राबवल्या आहेत. वेगवेगळ्या प्रकारे कोस्टल रोड असेल, टनेल्स चे नेटवर्क असेल ,ब्रिजेस, इंटिग्रेशन, मुंबईची लाईफ लाईन असलेली सबअर्बन रेल्वे असेल तिलाही पुढच्या 2 ते 3 वर्षात मेट्रोसारखे कोचेस आणतोय. त्यामुळे मुंबईचे संपूर्ण ट्रान्सफॉर्मेशन होत आहे, क्लस्टरचे अप्रुवल घेऊन मुंबईला स्लम फ्री कडे घेऊन जाण्याचा आमचा प्रयत्न आहे, दहा-बारा वर्ष त्याला लागतील पण त्याची सुरुवात आम्ही केली आहे असे मुख्यमंत्री म्हणाले.

आपण आता महाराष्ट्र रेल कंपनीला डीपीआर तयार करण्याचे काम दिले आहे. समृद्धी महामार्ग केला तेव्हा रेल्वे मार्गसाठी जागा सोडली आहे. आपल्याला आता मालवाहू रेल्वेची गरज आहे. जी मोठ्या प्रमाणात समान घेऊन जाण्याचे काम करु शकेल, मालवण आणि जेएनपिटीकडून देडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर काढायचा आणि नाशिक,जालना, वर्धा येथील ड्रॅय पोर्ट गगडचिरोली पर्यंत नेऊ शकलो तर अख्या महाराष्ट्राला पोर्ट लँड डेव्हलपमेंट चा फायदा मिळेल आणि महाराष्ट्राचे इंडस्त्रीलायजेशन करू शकू असेही ते म्हणाले.

## कासव माझी प्रेरणा; मुख्यमंत्री फडणवीस

देवेंद्र फडणवीस यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. या निर्णयांमुळे त्यांच्यावर बरीच टीकाही झाली. या टीकांकडे कसं पाहिलं जातं? असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला होता. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "काही लोक काही काळापुरती हेडलाईन देतात. काही लोक त्यांना लक्षात ठेवतात, पण लोक नंतर विसरून जातात. पण त्यांच्याकडून जे काम झालंय ते पिढ्यान् पिढ्या लक्षात राहतं. मला वाटतंय की मी बरोबर काम करतोय तर मी अत्यंत धीम्या गतीने का होईना काम करत राहतो. यासाठी कासव माझी प्रेरणा आहे. कासव चालत राहतो, कोणी दगड मारला की कवचात जातो. वरून दगड लागत राहतो, पण होत काही नाही. पण दगड मारणं थांबलं की पुन्हा चालत राहायचं. अर्थात चाल कासवाची नाहीय, चालीत वेग आहे, पण प्रेरणा कासवच आहे." अशा वेळेस त्यांनी राज्यातील विविध कामांचीही उल्लेख केला. एखादा व्यक्ती मोठ्या पदावर जातो तेव्हा त्याला टीका ऐकायला आवडत नाही, असं लोकांना वाटतं. पण गेल्या काही वर्षांत मी राजकारणात आहे त्यामुळे मला लगेच कळतं की समोरच्याला नेमकं काय म्हणायचं आहे, असंही ते म्हणाले.

# चाकणमध्ये कोट्यवधींचा गुटखा जप्त

## सहा तास पाठलाग करून गुटख्याने भरलेला ट्रक ताब्यात; FDA ची कारवाई

**महाईन्यूज । पुणे**

**अन्न व औषध प्रशासनाने चाकण-तळेगाव चौक परिसरात एक कोटी १३ लाख रुपयांचा गुटखा जप्त केला. सुमारे सहा तास पाठलाग करून संबंधित ट्रक जप्त करण्यात आला. आरोपींवर 'मकोका'अंतर्गत कारवाई करण्याचा प्रस्ताव 'एफडीए'ने पोलिसांकडे दिला. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, गुटख्याची वाहतूक करणारा ट्रक मध्य प्रदेशातून समृद्धी महामार्गाने भिवंडी आणि ठाण्याच्या दिशेने चालला होता.**







अन्न व औषध प्रशासन विभागाने गेल्या चार महिन्यांपासून राज्यांमध्ये सेफ ड्रग सेफ फूड सेफ महाराष्ट्र ही मोहीम राबवण्यास सुरुवात केली आहे.

या अंतर्गत खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्या विरोधात कठोर कारवाई करण्यात येत आहे तसेच गुटखा तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्यात येत आहेत याच कारवाईचा एक भाग म्हणून पुण्यातील चाकण भागात एक कोटीहून अधिक किमतीचा गुटखा जप्त करण्यात आला.

एफडीए'च्या पथकाने १८ सप्टेंबर रोजी दुपारी दोनच्या सुमारास या वाहनाचा माग काढण्यास सुरुवात केली. मात्र, चालकाने नियोजित मार्ग बदलून वाहन संगमनेरमार्गे पुण्याच्या दिशेने नेल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले.

मार्ग बदलल्याचे समजताच ठाणे आणि पुणे विभागाची पथके तत्काळ वेगवेगळ्या मार्गांवर तैनात करण्यात आली. राजगुरुनगर टोलनाक्यावर 'एफडीए'च्या अधिकाऱ्यांनी ट्रक थांबविण्याचा प्रयत्न केला. पण, यश आले नाही. मात्र, अधिकाऱ्यांनी स्थानिक पोलिसांच्या मदतीने पाठलाग सुरू ठेवला. नंतर रात्री आठ वाजता चाकण-तळेगाव चौकात ट्रक अडवून चालकाला ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी या कारवाई विषयी प्रतिक्रिया देताना सांगितले की, हा प्रकार केवळ कायद्याचे उल्लंघन नसून, सार्वजनिक आरोग्याशी खेळणारा संघटित गुन्हेगारीचा प्रकार आहे. संबंधितांविरुद्ध मोहीम सुरू राहणार आहे.

# पुण्यात सहा दिवसांत झाले इतक्या हजार गणेशमूर्तींचे विसर्जन!

**महाईन्यूज । पुणे**

**गणेशोत्सव काळात पुणे महापालिकेने राबविलेल्या पर्यावरणपूरक विसर्जन उपक्रमाला पुणेकरांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. गेल्या सहा दिवसांत लोखंडी टाक्या, सिमेंटचे हौद यांमध्ये ५३ हजार ८५२ गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले आहे. या काळात सुमारे ६८ हजार ६३३ किलो निर्माल्य गोळा केले आहे. उत्सवाच्या सहाव्या दिवशी गौरीबरोबरच १२ हजार ५१५ गणेशमूर्तींचे विसर्जन महापालिकेने उभारलेल्या विविध भागांतील विसर्जन घाटांवर झाले.**



### महापालिकेने केली ही तयारी पूर्ण..

- नदीपात्रांमध्ये ३७ ठिकाणी विसर्जनाची व्यवस्था
- शहरातील विविध ३५ घाटांवर विसर्जनाची सोय
- शहरातील ३८ ठिकाणी ६९ कृत्रिम हौदांची व्यवस्था
- २८१ ठिकाणी ६४८ लोखंडी टाक्यांची सोय
- ४ तलाव, ७ विहिरींमध्ये विसर्जन व्यवस्था
- कॅनॉलवर ४१ ठिकाणी होणार विसर्जन
- निर्माल्य कलश/कंटेनर : २७४ ठिकाणी, ३२८ कलश
- मूर्तिसंकलन/दानकेंद्रे : २४१

गणेशोत्सव पर्यावरणपूरक व्हावा, यासाठी महापालिकेच्या वतीने उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. नागरिकांनी 'श्रीं'ची मूर्ती नदीच्या पाण्यात विसर्जित न करता घाटांवर उभारण्यात आलेल्या लोखंडी टाक्या, तसेच हौदांमध्ये करावी, यासाठी जनजागृती केली जात आहे. मूर्ती नदीच्या पाण्यात विसर्जित केल्यास जलप्रदूषण वाढण्याची शक्यता असल्याने महापालिकेने गेल्या काही वर्षांपासून जनजागृती सुरू केली आहे.

विसर्जनासाठी येणाऱ्या नागरिकांच्या सोयीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याने नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. असे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संतोष वारुळे यांनी सांगितले. यासाठीची यंत्रणा महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून गेल्या काही आठवड्यापासून कार्यान्वित करण्यात आली आहे.

महापालिकेने तयार केलेल्या लोखंडी टाक्यांमध्ये विसर्जित झालेल्या मूर्ती ३४ हजार ११९ असून, हौदांमध्ये ८ हजार ४०२ विसर्जित झाल्या. महापालिकेने उभारलेल्या संकलन केंद्रात ११ हजार ३३१ मूर्ती जमा करण्यात आल्या. या सहा दिवसांमध्ये ६८ हजार ६३३ किलो निर्माल्य जमा करण्यात आल्याचे उपायुक्त वारुळे यांनी सांगितले.

विसर्जनाच्या दिवसांमध्ये विसर्जन घाटांवर होणारी गर्दी लक्षात घेऊन महापालिकेने क्षेत्रीय कार्यालयनिहाय नियोजन केले आहे. विसर्जन हौद, लोखंडी टाक्या, निर्माल्य संकलन केंद्रे, मूर्ती संकलनाची व्यवस्था प्रत्येक घाटावर करण्यात आली आहे.

विसर्जनाच्या प्रत्येक टप्प्यावर नागरिकांना आवश्यक सेवा सुविधा उपलब्ध करून देण्याची तयारी प्रशासनाने पूर्ण केली आहे. गणेशोत्सवातील गर्दीचे नियोजन करतानाच पर्यावरणपूरक विसर्जनाला चालना देण्यासाठी महापालिकेचे प्रयत्न आहेत.

गेल्या वर्षी महापालिकेने गणेशोत्सवाच्या काळात स्वंयसेवी संस्थांच्या माध्यमातून शाडू माती संकलित करून तिचा पुनर्वापर केला. गेल्या वर्षी २०२५ मध्ये सुमारे ३९ टन शाडू माती संकलित करण्यात आली. तसेच, निर्माल्यापासून अगरबत्ती निर्मितीचा उपक्रमदेखील राबविण्यात आला. गेल्या वर्षी गणेशोत्सवात महापालिकेने बांधलेल्या हौदांमध्ये १ लाख १३ हजार १३६ मूर्ती, लोखंडी टाक्यांमध्ये ३ लाख ६२ हजार ३१९ मूर्ती, तर १ लाख ७८ हजार ९५५ 'श्रीं' च्या मूर्ती संकलन केंद्रांवर विसर्जित करण्यात आल्या. अशा एकूण ६ लाख ५४ हजार ४१० गणेश मूर्तींचे विसर्जन झाले. तर ९ लाख २३ हजार ३९८ किलो निर्माल्य संकलित करण्यात आले.

# गणेशोत्सवात मेट्रोला भाविकांची पसंती

## शनिवारपर्यंत तब्बल २१ लाखांहून अधिक प्रवाशांचा प्रवास, ३.२७ कोटींचे उत्पन्न

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड शहरातून पुणे शहरातील देखावे पाहण्यासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी मेट्रो प्रशासनाने गणेशोत्सव काळात मध्यरात्री दोनपर्यंत मेट्रो चालवण्याचा निर्णय घेतला आहे. याला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळताना दिसून येत आहे. यंदाच्या गणेशोत्सव काळात पिंपरी ते सिव्हिल कोर्ट आणि वनाज ते रामवाडी या दोन्ही मेट्रो मार्गांवर शनिवारपर्यंत सुमारे २१ लाख ७ हजार ८०२ प्रवाशांनी प्रवास केला आहे.**





शनिवारी एकाच दिवशी मध्यरात्री दोन पर्यंत ४ लाख ७८ हजार ४७७ प्रवाशांनी मेट्रोतून प्रवास केला. यातून मेट्रोला ६० लाख २५ हजार २७१ रुपयांचे उत्पन्न मिळाले. पुण्यातील अनेक गणेश मंडळांनी जिवंत देखावे आणि देशातील विविध देवतांच्या प्रसिद्ध मंदिरांचे देखावे साकारले आहेत. हे पाहण्यासाठी उपनगरांतून व बाहेरगावाहून नागरिक मोठ्या संख्येने शहराच्या मध्यवर्ती भागात येतात. हे देखावे रात्री उशिरापर्यंत सुरू राहत असल्यामुळे नागरिकांची परत जाताना गैरसोय होऊ नये म्हणून मेट्रो प्रशासनाने गणेशोत्सव काळात म्हणजेच १७ ते २४ सप्टेंबरपर्यंत सकाळी ६ ते रात्री दोनपर्यंत आणि अनंत चतुर्दशीच्या दिवशी म्हणजेच २५ सप्टेंबरला २४ तास मेट्रो सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. गणरायाचे गेल्या सोमवारी आगमन झाले. दीड, पाचव्या दिवशीच्या गणरायांचे विसर्जन झाले आहे.

शनिवारी गौरी-गणपतीचे विसर्जन झाले. शनिवारी आणि रविवारी सुट्टी असल्यामुळे नागरिक मोठ्या संख्येने देखावे पाहण्यासाठी पुण्यात गेले होते. देखावे पाहण्यासाठी ग्रामीण भागातून आलेल्या भाविकांनीही मेट्रो प्रवासाचा आनंद घेतला. तसेच जलद आणि आरामदायी प्रवास होत असल्यामुळे शहरातील नागरिकांनी देखील मेट्रोला पसंती दर्शवली आहे.

पिंपरी ते स्वारगेट (पर्पल लाईन) या मार्गिकेवर दोन लाख ६८ हजार ९३८ प्रवाशांनी प्रवास केला. यातून मेट्रोला ३६ लाख ८९ हजार ७५१ रुपये उत्पन्न मिळाले. तर वनाज ते रामवाडी (अ‍ॅक्वा) या मार्गिकेवर दोन लाख नऊ हजार ५३९ प्रवाशांनी प्रवास केला. यातून मेट्रोला २३ लाख ३५ हजार ५२० रुपये उत्पन्न मिळाले. या महिन्यातील आणि यंदाच्या गणेशोत्सवातील सर्वाधिक प्रवाशांची नोंद शनिवारी झाली आहे.

### मेट्रो प्रवासी संख्या आणि उत्पन्न

| मार्ग | प्रवासी संख्या | उत्पन्न |
|---|---|---|
| स्वारगेट ते पिंपरी | ११,१९,५३९ | १,८६,४१,९७० |
| वनाज ते रामवाडी | ९,८८,२६३ | १,४१,३५,४६२ |
| एकूण प्रवासी संख्या | २१,०७,८०२ | ३,२७,७७,४३२ |

# स्वर्गीय तात्या बापट स्मृती समितीच्या 'भारत माता भवन'च्या वास्तुवृद्धीचा शुभारंभ

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**चिंचवड येथील स्वर्गीय तात्या बापट स्मृती समिती संचलित 'भारत माता भवन'च्या वास्तुवृद्धीचा (इमारतीवर दोन नवीन मजले) बांधण्याच्या कामाचा शुभारंभ खासदार श्रीरंग बारणे यांच्या शुभहस्ते रविवारी पार पडला. या वास्तूच्या विस्तारासाठी बारणे यांनी खासदार निधीतून ५० लाख रुपयांचा निधी दिला असून, आवश्यकतेनुसार अतिरिक्त निधी देण्याची ग्वाहीदेखील खासदार बारणे यांनी या वेळी दिली.**



यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाहक मुकुंदराव कुलकर्णी, प्रांत संपर्क प्रमुख मिलिंदराव देशपांडे, पिंपरी-चिंचवड शहर संघचालक विनोद बन्सल, संघ अधिकारी विनायकराव थोरात, महापालिकेच्या 'ब' प्रभागाचे अध्यक्ष मंदार देशपांडे, प्रकल्प आर्किटेक्ट उदय कुलकर्णी, जयदीप खापरे, रवी नामदे, उदय हळदीकर उपस्थित होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रेरणेने कार्यरत असलेल्या तात्या बापट स्मृती केंद्राचे कार्य अत्यंत उल्लेखनीय असल्याचे सांगत खासदार बारणे म्हणाले, 'पूर्वांचल राज्यातील विद्यार्थ्यांना येथे आणून त्यांच्यावर उत्तम संस्कार केले जातात. भारतीय संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्याचे मोठे कार्य या माध्यमातून होत आहे. देशाची अखंडता आणि राष्ट्रीय एकात्मता दृढ करण्यासाठी ही संस्था गेल्या अनेक वर्षांपासून मोलाचे योगदान देत आहे'.

'या वसतिगृहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आणि राहण्याचा सर्व खर्च उचलून त्यांना दर्जेदार शिक्षण दिले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने देशातील आदिवासी भाग आणि पूर्वांचल राज्यांच्या विकासाला प्राधान्य दिले आहे. त्याच धर्तीवर मावळ लोकसभा मतदारसंघातील आदिवासी घटक आणि सामाजिक संस्थांना सातत्याने सहकार्य केले जात आहे. यापूर्वीही कर्जत तालुक्यातील आदिवासी भवनासाठी ५० लाखांचा निधी देण्यात आला होता, तसेच संस्थेला अ‍ॅम्ब्युलन्सदेखील उपलब्ध करून देण्यात आल्याचे'. खासदार बारणे यांनी सांगितले.



## भूमिका

**भारत-अमेरिका संबंध गेल्या काही वर्षांत धोरणात्मकदृष्ट्या अधिक जवळ आले असले, तरी व्यापार आणि ऊर्जा धोरणाच्या मुद्द्यावर दोन्ही देशांमध्ये मतभेद कायम आहेत. रशियाकडून भारताची सुरू असलेली कच्च्या तेलाची खरेदी हा या मतभेदांचा केंद्रबिंदू बनला आहे.**

# टेरिफचा फास



अमेरिकेच्या काँग्रेसने मंजूर केलेल्या ‘LINDSEY O. GRAHAM SANCTIONING RUSSIA AND IRAN ACT OF 2026’ मुळे या तणावाला आता नवे वळण मिळाले आहे. या कायद्यानुसार रशियन तेल किंवा गॅसच्या प्रमुख खरेदीदार देशांवर १०० टक्क्यांपर्यंत अतिरिक्त आयात शुल्क लावण्याचा अधिकार अमेरिकेच्या अध्यक्षांना मिळाला आहे. मात्र, हे शुल्क भारतावर आपोआप लागू झालेले नाही; त्याचा वापर करण्याचा निर्णय अमेरिकन प्रशासन घेणार आहे.

या निर्णयामागे अमेरिकेचा स्पष्ट उद्देश रशियाच्या ऊर्जा महसुलावर दबाव आणणे हा आहे. युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर रशियाची आर्थिक ताकद कमी करण्यासाठी अमेरिका सातत्याने निर्बंधांचा वापर करत आहे. मात्र, त्याचा परिणाम भारतासारख्या देशांवरही होऊ शकतो. भारतासाठी प्रश्न केवळ परराष्ट्र धोरणाचा नाही, तर ऊर्जा सुरक्षेचीही आहे.

भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेचा मोठा हिस्सा आयात करतो. रशिया सध्या भारताचा सर्वात मोठा कच्च्या तेलाचा पुरवठादार असून, ऑगस्टमध्ये रशियाकडून भारताची आयात सुमारे २.१ दशलक्ष बॅरल प्रतिदिन राहिली आणि एकूण आयातीत रशियाचा वाटा ४० टक्क्यांहून अधिक होता. त्यामुळे एका झटक्यात रशियन तेलापासून दूर जाणे हा आर्थिकदृष्ट्या सोपा पर्याय नाही.

भारतासाठी यातील खरी कसोटी म्हणजे स्वस्त ऊर्जा, पुरवठ्याची स्थिरता आणि परराष्ट्र धोरणातील स्वायत्तता यांचा समतोल साधणे. रशियाकडून मिळणारे तेल तुलनेने अनुकूल दरात उपलब्ध झाल्याने त्याचा फायदा भारतीय रिफायनरी आणि ग्राहकांना झाला आहे. दुसरीकडे, अमेरिकन बाजारपेठ भारतीय निर्यातदारांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे १०० टक्क्यांपर्यंत शुल्क लागू झाले, तर भारतीय वस्तूंच्या अमेरिकेतील स्पर्धात्मकतेवर मोठा परिणाम होऊ शकतो.

तथापि, भारताने पर्यायी मार्ग शोधण्यास सुरुवात केली आहे. ऑगस्टमध्ये रशियन तेलाची आयात कमी झाली असताना व्हेनेझुएला, पश्चिम आशिया आणि इतर स्रोतांकडून पुरवठा वाढवण्याचे प्रयत्न दिसून आले. पण पर्यायी स्रोत म्हणजे अतिरिक्त खर्च. वाहतूक, कच्च्या तेलाची किंमत, विमा आणि रिफायनिंगची रचना यांचा परिणाम अखेरीस देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि इंधनाच्या किमतीवर होऊ शकतो.

म्हणूनच या संपूर्ण प्रश्नाकडे भावनिक किंवा केवळ अमेरिका-विरोधी दृष्टिकोनातून पाहणे योग्य ठरणार नाही. अमेरिकेलाही भारतासारख्या मोठ्या बाजारपेठेशी व्यापारसंबंध टिकवून ठेवण्याचे आर्थिक हित आहे. त्याच वेळी भारतालाही अमेरिकन बाजारपेठेचे महत्त्व नाकारता येणार नाही. त्यामुळे टेरिफच्या धमकीला उत्तर देताना राजनैतिक संवाद, व्यापार वाटाघाटी आणि पर्यायी ऊर्जा स्रोत या तिन्ही आघाड्यांवर काम करणे आवश्यक आहे.

भारताची ऊर्जा सुरक्षा कोणत्याही एका देशाच्या दबावावर अवलंबून राहता कामा नये. रशिया, अमेरिका, आखाती देश, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका अशा विविध स्रोतांमधून ऊर्जा मिळवण्याचे धोरण अधिक मजबूत करावे लागेल. अमेरिकेने आपल्या निर्बंध धोरणाचा वापर करताना भारताच्या ऊर्जा गरजा आणि द्विपक्षीय व्यापाराचे व्यापक परिणामही लक्षात घेणे आवश्यक आहे.

आजचा टेरिफचा फास केवळ भारत-रशिया व्यापाराभोवती नाही; तो भारताच्या धोरणात्मक स्वायत्ततेची आणि ऊर्जा सुरक्षेचीही परीक्षा आहे. भारतासाठी पुढचा मार्ग संघर्षाचा नसून, राष्ट्रीय हित जपत संतुलित आणि बहुआयामी आर्थिक-राजनैतिक धोरणाचा असायला हवा.

## प्रासंगिक »

### छोटा दिवा

**एका गावात गणू नावाचा लोहार राहत होता. त्याच्या दुकानात मोठी भट्टी होती. एकदा गावकऱ्यांनी त्याला विचारले, “तुझ्याकडे कोळसा, लाकूड आणि लोखंड भरपूर आहे; मग गावासाठी लागणारी अवजारे वेळेवर का तयार होत नाहीत?”**

गणू म्हणाला, “सामग्री भरपूर आहे, पण भट्टी पेटवण्यासाठी योग्य व्यवस्था नाही.” त्याने दुसऱ्या दिवशी भट्टीची दुरुस्ती केली. हवा खेळती राहण्यासाठी नवी नळी बसवली आणि इंधन योग्य प्रमाणात वापरले. भट्टी पेटताच कामाचा वेग वाढला. काही दिवसांत गावातील शेतकऱ्यांना आवश्यक असलेली अवजारे तयार होऊ लागली. गावातील एका वृद्धाने गणूला सांगितले, “साधनसंपत्ती असणे पुरेसे नसते. तिचा योग्य उपयोग करण्याची क्षमता आणि व्यवस्था असेल तरच ती संपत्ती विकास घडवते.” गणूला ही गोष्ट मनापासून पटली. त्याने पुढे प्रत्येक कामात आधी साधनांची उपलब्धता आणि त्यानंतर त्यांचा योग्य वापर याकडे लक्ष दिले.

- तात्पर्य :

**साधनसंपत्ती मिळवणे महत्त्वाचे; पण तिचा योग्य उपयोग करण्याची व्यवस्था उभी करणे त्याहून महत्त्वाचे.**

स्त्री-पुरुष समानतेचा उद्घोष आपण सातत्याने करीत असलो, तरी प्रत्यक्ष वास्तवाकडे पाहिले की या समानतेचा प्रवास अद्याप अपूर्ण असल्याचे जाणवते. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या ग्लोबल जेंडर गॅप अहवालात भारताची स्थिती याचीच जाणीव करून देते.

# समानतेची सीमारेषा...

१४५ देशांच्या क्रमवारीत भारत १३१ व्या स्थानी आहे. देशाने विविध क्षेत्रांत प्रगती केली असली, तरी महिलांना समान संधी, आर्थिक स्वातंत्र्य आणि निर्णयप्रक्रियेत समान स्थान देण्याच्या बाबतीत अजून मोठा पल्ला गाठायचा आहे.

भारतीय संस्कृतीत नारीशक्तीचा गौरव करणारी परंपरा आहे. मात्र, त्याच समाजव्यवस्थेत महिलांसाठी अनेक बंधनेही निर्माण झाली. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्यासारख्या समाजसुधारकांनी शिक्षणाचा मार्ग खुला केल्यामुळे महिलांच्या प्रगतीची दारे उघडली. आज महिला डॉक्टर, अभियंता, शास्त्रज्ञ, अधिकारी, उद्योजक, वैमानिक अशा विविध क्षेत्रांत कर्तृत्व सिद्ध करीत आहेत. तरीही केवळ शिक्षण आणि नोकरी मिळणे म्हणजे समानता नव्हे.

महिलेने उच्चशिक्षण घेतले असले, तरी विवाहानंतर करिअर सुरू ठेवायचे की नाही, हा निर्णय जर तिच्याऐवजी कुटुंबातील इतर सदस्य घेत असतील, तर तिच्या स्वातंत्र्याचा प्रश्न कायम राहतो. नोकरी करणाऱ्या महिलांवर घर, मुलांचे संगोपन, स्वयंपाक आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे ओझेही तुलनेने अधिक असते. परिणामी, पुरुष




आणि महिला दोघेही रोजगारात असले तरी घरातील श्रमांचे समान वाटप होत नाही. ही विषमता बदलल्याशिवाय समानतेची संकल्पना अपुरीच राहणार आहे.

कार्यस्थळावरील समानताही तितकीच महत्त्वाची आहे. समान कामासाठी समान वेतन, सुरक्षित कार्यस्थळ, प्रसूतीनंतर पुन्हा करिअरमध्ये परतण्याची संधी आणि नेतृत्वाच्या पदांवर महिलांना स्थान मिळणे आवश्यक आहे. मातृत्वाकडे केवळ संस्थेवरील आर्थिक भार म्हणून पाहिले गेले, तर महिलांच्या करिअरवर त्याचा थेट परिणाम होतो. मातृत्व आणि व्यावसायिक यश हे परस्परविरोधी नसून, दोन्ही गोष्टींसाठी संस्थात्मक पाठबळ निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

समानतेचा प्रश्न केवळ रोजगारापुरता मर्यादित नाही. आरोग्य, पोषण, सुरक्षा, मालमत्तेवरील अधिकार, आर्थिक निर्णय आणि राजकीय सहभाग या प्रत्येक क्षेत्रात महिलांना समान संधी मिळणे आवश्यक आहे. मुलींच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्या सुरक्षिततेची हमी देणे आणि कुटुंबाच्या संपत्तीत त्यांचा अधिकार प्रत्यक्षात मान्य करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

लिंगसमानतेची खरी सुरुवात कायद्यांपेक्षा मानसिकतेच्या बदलातून होते. मुलगा आणि मुलगी यांच्यातील फरक घरातील जबाबदाऱ्या वाटपापासूनच कमी झाला पाहिजे. मुलांना लहानपणापासून समानतेचे संस्कार देणे, महिलांच्या श्रमांना आर्थिक आणि सामाजिक मूल्य देणे आणि निर्णयप्रक्रियेत त्यांचा स्वतंत्र आवाज मान्य करणे आवश्यक आहे.

स्त्रीला एका चौकटीत बसवून तिच्या कर्तृत्वाचे मोजमाप करता येणार नाही. समानतेची खरी कसोटी म्हणजे महिलांना पुरुषांपेक्षा अधिक किंवा कमी नव्हे, तर समान संधी, समान अधिकार आणि स्वतःचे निर्णय घेण्याचे समान स्वातंत्र्य मिळणे. ही सीमारेषा आकडेवारीत नव्हे, तर समाजाच्या मानसिकतेतून पुसली गेली, तरच खऱ्या अर्थाने समानतेचे पर्व सुरू होईल.

## ।। अभंगवाणी ।।



मृगजळा काय करावा उतार ।
पावावया पार पैल थडी ॥१॥

खापराचे होन खेळती लेंकुरें ।
कोण त्या वेव्हारें लाभ हाणि ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कोस्टल रोडवर BMWचा अपघात!

## पहाटे भरधाव BMW रेलिंग तोडून ४० ते ५० फूट खाली कोसळली; तिघांचा मृत्यू

महाईन्यूज । मुंबई

**मुंबईतील कोस्टल रोडवर आज रविवारी भल्यापहाटे भीषण अपघात झाला. या अपघातात तिघांचा मृत्यू झाला आहे. तर चार जण जखमी झाले आहेत. कोस्टल रोडवरील लाला लजपतराय महाविद्यालयासमोर पहाटे 5 वाजून 20 मिनिटांच्या सुमारास हा अपघात घडला. बीएमडब्ल्यू कार भरधाव वेगात असल्यानं हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.**



प्राथमिक माहितीनुसार, ही बीएमडब्ल्यू कार मरीन ड्राईव्हहून हाजीअलीच्या दिशेने जात होती. ही कार अत्यंत वेगानं रस्त्यावरुन जात होती. कोस्टल रोडवरील लोटस जेटीजवळ आल्यावर या कारवरील चालकाचं नियंत्रण अचानक सुटलं. त्यानंतर ही कार रेलिंगला धडकली आणि पुलावरुन थेट खाली कोसळली. या अपघातात कारचा पूर्णपणे चेंदामेंदा झाला आहे. कारमधील जखमींना तातडीनं उपचारासाठी नायर रुग्णालयात दाखल करण्यात आलं. उपचारादरम्यान तिघांचा मृत्यू झाला. शानय गज्जल (वय 21), धिर्या सेठ (वय 17) आणि एका (वय 25) वर्षीय अनोळखी तरुणाचा अपघातात मृत्यू झाला आहे. तर एका 20 वर्षीय तरुणीची प्रकृती गंभीर आहे. तिच्यावर ट्रॉमा वॉर्डमध्ये उपचार सुरु आहेत. सध्या पोलिसांकडून या घटनेचा पुढील तपास सुरु आहे.

अपघातग्रस्त बीएमडब्ल्यू कार ही मरीन ड्राईव्हहून हाजीअलीच्या दिशेने जात होती. ही कार अनियंत्रित झाल्यानंतर रेलिंगशेजारी असलेला लाईटचा खांब आणि बोर्ड तोडून पुलावरुन खाली पडली. गाडीचा पूर्णपणे चेंदामेंदा झाला. गाडीची परिस्थिती पाहून हा अपघात किती भीषण होता, याची कल्पना येऊ शकते. सध्या पोलिसांकडून गाडीचा पंचनामा सुरु असून फॉरेन्सिक पथकही घटनास्थळी दाखल झालं आहे. कोस्टल रोडवर वेगमर्यादा घालून देण्यात आली आहे. मात्र, या बीएमडब्ल्यू कारनं वेगाचे सर्व नियम मोडल्यानं ती अनियंत्रित होऊन जवळपास 40 ते 50 फुटावरुन खाली पडली. त्यामुळे गाडीतील तिघांचा जागेवरच मृत्यू झाला.

पहाटेची वेळ असल्यानं अपघात झाल्याचं लगेच कोणाच्या लक्षात आलं नाही. त्यामुळे जखमींना रुग्णालयात नेण्यात काहीसा उशीर झाला. ताडदेव पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदवला आहे.

### गुजरात पासिंगची कार

दरम्यान, प्राथमिक तपासात बीएमडब्ल्यू कार ही गुजरात राज्यातील सिल्वास शहरातील असल्याची माहिती समोर आली आहे. तर गाडीतील चारही मुलं ही गुजरातच्या अहमदाबादची राहणारी आहेत. पोलिसांकडून घटनेचा पंचनामा करून मृत व जखमी मुलांच्या कुटुंबियांना या घटनेची माहिती देण्यात आली आहे.

हा अपघात नेमका कशामुळे झाला होता? हे अद्या समजू शकलेलं नाही. बीएमडब्ल्यू कारमधील तरुण आणि तरुणी एकाच वयाचे होते. त्यामुळे या सगळ्यांनी मद्यपान केलं होतं का? याचीही पोलिसांकडून तपास केला जात आहे.

---

# मुंबईतील सर्वात मोठ्या गरब्यात मुस्लिमांना प्रवेशासाठी भाजपा आमदाराचे निर्बंध!

महाईन्यूज । मुंबई

**नवरात्रीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील गरबा आणि दांडिया आयोजनांवरून पुन्हा एकदा नव्या वादाला तोंड फुटले आहे. मुंबईतील बोरीवली परिसरामध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या एका भव्य गरबा महोत्सवात मुस्लिमांच्या प्रवेशावर निर्बंध घालण्याची घोषणा करण्यात आली आहे. "ज्या मुस्लिमांना या गरबा उत्सवात सहभागी व्हायचे आहे, त्यांनी कपाळावर टिळा लावावा, सनातन धर्मावर श्रद्धा ठेवावी आणि देवीची पूजा करावी," असे विधान भाजपा आमदार संजय उपाध्याय यांनी केले आहे.**



बोरीवलीतील या प्रसिद्ध गरबा आयोजनाच्या भूमिपूजन आणि पत्रकार परिषदेदरम्यान ही घोषणा करण्यात आली. या प्रसंगी भाजपा आमदार संजय उपाध्याय यांच्यासह भाजपा आमदार मनीषा चौधरी आणि माजी खासदार गोपाळ शेट्टी हेदेखील उपस्थित होते.

गरबा महोत्सवातील मुस्लिम समाजाच्या सहभागावर बोलताना भाजप आमदार संजय उपाध्याय यांनी आक्रमक भूमिका घेतली. "या वेळी गरबामध्ये मुस्लिमांना थेट प्रवेश दिला जाणार नाही. ज्यांना यायचे आहे त्यांनी आपल्या पत्नी, बहीण आणि कन्येसोबत यावे. कपाळाला टिळा लावावा आणि आद्यशक्ती देवीची पूजा करावी. आधी सनातन धर्मावर विश्वास ठेवा आणि मगच गरबा मंडपात पाऊल ठेवा. हे ठिकाण 'लव्ह जिहाद'साठी नाही," असा थेट इशारा उपाध्याय यांनी दिला.

माजी भाजपा खासदार गोपाळ शेट्टी यांनीदेखील या भूमिकेचे समर्थन केले. ते म्हणाले की, जर एखादी मुस्लिम व्यक्ती कपाळाला टिळा लावून येत असेल, तर त्यांना गरबामध्ये सहभागी होता येईल. हिंदू आणि मुस्लिमांच्या सांस्कृतिक देवाणघेवाणीचा संदर्भ देत शेट्टी म्हणाले, "मुस्लिम आणि ख्रिश्चन बांधवांचे पूर्वज हे हिंदूच होते. त्यामुळे त्यांनी कपाळाला टिळा लावण्यास काहीच हरकत नाही. जेव्हा हिंदू नेते ईदच्या कार्यक्रमांना जातात, तेव्हा ते आदराने मुस्लिम टोपी घालतात. त्याचप्रमाणे जर मुस्लिमांना गरबामध्ये यायचे असेल, तर त्यांनीही टिळा लावण्यास आक्षेप घेऊ नये."

गरबा आयोजक संतोष सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, यंदाच्या उत्सवासाठी सुरक्षेची विशेष आणि कडक यंत्रणा उभारण्यात येत आहे. गरबा मंडपात प्रवेश देण्यापूर्वी प्रत्येक व्यक्तीचे आधार कार्ड तपासले जाईल, जेणेकरून संशयास्पद व्यक्तींना रोखता येईल.

उल्लेखनीय म्हणजे, विश्व हिंदू परिषदेने (VHP) आधीच राज्यभरातील गरबा आयोजकांना प्रवेशद्वारावर ओळखपत्रे तपासण्याचे आणि बिगर-हिंदूंच्या प्रवेशावर नियंत्रण ठेवण्याचे आवाहन केले आहे.

### फाल्गुनी पाठक आणि गीता रबारी यांची उपस्थिती

बोरीवलीतील हा गरबा उत्सव मुंबईतील सर्वात मोठ्या आणि लोकप्रिय आयोजनांपैकी एक मानला जातो. यंदा या महोत्सवात प्रसिद्ध 'दांडिया क्वीन' फाल्गुनी पाठक आणि प्रख्यात गायिका गीता रबारी यांच्या संगीताची मैफल रंगणार आहे. नवरात्री उत्सव काही दिवसांवर येऊन ठेपलेला असताना, राजकीय नेत्यांच्या या विधानांमुळे आणि आयोजकांच्या या निर्णयामुळे मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रातील गरबा आयोजनांमधील मुस्लिम सहभागाचा मुद्दा चांगलाच तापण्याची शक्यता आहे.

# युक्रेनचा रशियावर भीषण ड्रोन हल्ला!

## तेल शुद्धीकरण प्रकल्प जळून खाक, झेलेन्स्कींनी VIDEO केला शेअर

**महाईन्यूज । युक्रेन**

**गेल्या चार वर्षांपासून रशिया-युक्रेनमध्ये युद्ध सुरू आहे. दोन्ही देश एकमेकांच्या शहरांवर हल्ले करत आहेत. अद्यापही या दोन्ही देशातील संघर्ष संपलेला नाही. रशिया-युक्रेन संघर्ष थांबवण्यासाठी अमेरिकेनेही प्रयत्न केला. मात्र, अमेरिकेच्या प्रयत्नालाही यश आलं नाही. आता पुन्हा एकदा युक्रेनने रशियावर भीषण ड्रोन हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे.**



युक्रेनने रशियाच्या मॉस्को शहरातील तेल शुद्धीकरण प्रकल्पावर भीषण हवाई हल्ले केले आहेत. या हल्ल्यात रशियाच्या तेल शुद्धीकरण प्रकल्पाचं मोठं नुकसान झालं आहे. या हवाई हल्ल्याचा व्हिडीओ युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनी एक्सवर (ट्विटर) शेअर करत युक्रेनच्या सैन्याचं कौतुक केलं आहे. या संदर्भातील वृत्त टाइम्स नाऊने दिलं आहे.

वृत्तानुसार, शनिवारी रात्री ते रविवारी पहाटेच्या दरम्यान युक्रेनच्या सैन्याने रशियावर १ हजार ६०० पेक्षा जास्त ड्रोन डागले आहेत. या हल्ल्याला मॉस्कोचे महापौर सेर्गेई सोब्यानिन यांनी रशियन राजधानीवरील 'सर्वात मोठा' ड्रोन हल्ला असं म्हटलं आहे. दरम्यान, रशियामध्ये होत असलेल्या पहिल्या संसदीय निवडणुकीच्या मतदानाचा हा तिसरा आणि अंतिम दिवस होता. मात्र, या निवडणुकीच्या काळातच हा हल्ला करण्यात आल्याने सेर्गेई सोब्यानिन यांनी युक्रेनवर मतदानात व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला आहे.

"हा अभूतपूर्व हल्ला स्पष्टपणे निवडणुकांमध्ये व्यत्यय आणण्याच्या उद्देशानेच आखला गेला होता. मात्र, शत्रूला त्यात यश आलं नाही", असं मॉस्कोचे महापौर सेर्गेई सोब्यानिन यांनी म्हटलं आहे. रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितलं की, रशियन सैन्याने देशभरात १ हजार १०० ड्रोन निकामी केले. मात्र, मॉस्कोच्या दिशेने आलेले सर्वच ड्रोन रोखण्यात यश आलं नाही.

"मॉस्कोच्या काही भागात काल रात्री आमच्या लांब पल्ल्याच्या हल्ल्यांचा अत्यंत महत्त्वपूर्ण परिणाम दिसून आला. यामध्ये रशियाच्या तेल उद्योगातील एका प्रमुख केंद्राला आणि सैन्याच्या पुरवठा व वाहतूक सुविधेला लक्ष्य करण्यात आलं होतं. ही अशी केंद्र आहेत जी रशियाच्या युद्ध यंत्रणेला अब्जावधी डॉलर्सचा निधी पुरवतात. या हल्ल्यांसाठी एफपी-१, आरझेड-१००, एमआयसीएच-२०००, पॅलियानित्सिया, व्हेन्डेट्टा, ल्युती, बार्स, फ्लेमिंगो, सिचेन या सारख्या क्षेपणास्त्र प्रणालींचा वापर करण्यात आला. मी आमच्या योद्ध्यांचे त्यांच्या अचूक कामगिरीबद्दल कौतुक करतो", असं झेलेन्स्की यांनी म्हटलं आहे.

"यात युक्रेनची सुरक्षा सेवा, मानवरहित प्रणाली दल, विशेष अभियान दल, युक्रेनची संरक्षण गुप्तचर यंत्रणा आणि परदेशी गुप्तचर सेवा यांचा समावेश आहे. तसेच वोरोनेझ भागातील एका केंद्रावरही निर्बंध लादण्यात आले आहेत. रशियाने हे क्रूर युद्ध थांबवलं पाहिजे आणि शांततेचा मार्ग निवडला पाहिजे. तणाव कमी करण्याच्या दिशेने पावलं उचलण्याचे पर्याय, विशेषतः ऊर्जा आणि अन्न सुरक्षेच्या संदर्भात उपलब्ध आहेत. गरज आहे ती केवळ राजकीय इच्छाशक्तीची. युक्रेनची लांब पल्ल्याची क्षमता बळकट करणाऱ्या प्रत्येकाचे मी आभार मानतो. आमच्या लांब पल्ल्याच्या हल्ल्यांना निर्बंधांच्या माध्यमातून पूरक प्रतिसाद देणाऱ्या प्रत्येकाचा मी ऋणी आहे. युक्रेनचा विजय असो", असं झेलेन्स्की यांनी एक्स पोस्टमध्ये म्हटलं आहे.

### दोन ठार, सहा जण जखमी

मॉस्कोचे गव्हर्नर आंद्रे वोरोब्योव्ह यांनी या हल्ल्याचं वर्णन 'प्रचंड' असं केलं. त्यांनी सांगितलं की, या संपूर्ण क्षेत्रात किमान दोन जण ठार झाले आणि सहा जण जखमी झाले. तसेच अनेक निवासी घरे आणि एका स्थानिक गोदामाला आग लागल्याचंही त्यांनी नमूद केलं.

# पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या बहिणीला अटक

**महाईन्यूज । पाकिस्तान**

**पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान हे २०२३ पासून रावळपिंडीच्या तुरूंगात आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांच्या मृत्यूच्या अफवा पसरल्या होत्या, त्यामुळे पाकिस्तानमध्ये गोंधळाचं वातावरण निर्माण झालं होतं. मात्र, त्यानंतर तुरुंग प्रशासनाने इम्रान खान यांच्या प्रकृतीबद्दलच्या अफवा निराधार असल्याचं स्पष्टीकरण देत अफवा फेटाळून लावल्या होत्या.**




दरम्यान, आता माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या बहिणीला अटक करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. इम्रान खान यांची बहीण अलीमा खान यांना रविवारी लाहोरमधील त्यांच्या घरातून पोलिसांनी अटक केली आहे. अलीमा खान यांच्या अटकेमुळे पाकिस्तानात मोठी खळबळ उडाली आहे.

इम्रान खान यांनी स्थापन केलेल्या पाकिस्तान तेहरीक-ए-इन्साफ (पीटीआय) पक्षाद्वारे एक निषेध मोर्चा काढण्यात येणार होता. या मोर्चाची मोठी तयारी करण्यात आली होती. मात्र, मोर्चाची तयारी करत असतानाच पोलिसांनी अलीमा खान यांना अटक केली आहे. २७ सप्टेंबर रोजी नियोजित असलेल्या एका मोर्चाच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आल्याची माहिती सांगितली जात आहे.

दरम्यान, माजी पंतप्रधान इम्रान खान यांना तुरुंगात मिळणाऱ्या वागणुकीविरुद्ध अलीमा खान यांनी सातत्याने आवाज उठवला होता. काही दिवसांपूर्वी यावरून त्यांनी थेटपणे आपली भूमिका मांडली होती. त्यानंतर अवघ्या काही दिवसांतच आता पाकिस्तान सरकारने त्यांच्यावर अटकेची कारवाई केली आहे.

### आंदोलनाचा इशारा

पीटीआयने इस्लामाबादकडे २७ सप्टेंबरला प्रस्तावित मोर्चा काढण्याची योजना असल्याचं म्हटलं होतं. खैबर पख्तूनख्वाचे मंत्री शाफी जान यांनी पक्ष चर्चेसाठी तयार असल्याचं सांगितलं होतं. मात्र मागण्यांवर ठोस प्रगती झाल्याशिवाय आंदोलनाचा निर्णय बदलला जाणार नसल्याचं स्पष्ट केलं होतं. त्यांनी इम्रान खान यांच्या प्रकृतीला पक्षासाठी सर्वाधिक महत्त्व असल्याचंही म्हटलं होतं. मात्र, यानंतर आता पोलिसांनी अलीमा खान यांच्यावर अटकेची कारवाई केली आहे.



# गणेशोत्सवासाठी आयेशा खानचा खास मराठमोळा साज

शरारत' गाण्यातील आपल्या ग्लॅमरस आणि दमदार अंदाजाने देशभरातील चाहत्यांचं लक्ष वेधून घेणारी अभिनेत्री आयेशा खान पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. यावेळी ना कोणता चित्रपट, ना कोणतं डान्स परफॉर्मन्स... तर अभिनेत्रीच्या नखरेल मराठमोळ्या लूकने सोशल मीडियावर धुमाकूळ घातला आहे.

गणेश चतुर्थीच्या निमित्ताने आयेशाने साडी, नथ आणि चंद्रकोर बिंदीचा असा काही सुंदर मिलाफ केला की, तिचे फोटो पाहून चाहते अक्षरशः घायाळ झाले आहेत. पारंपरिक मराठी साज आणि ग्लॅमरस अंदाज यांचा सुरेख मेळ साधणारा तिचा हा लूक सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला आहे. आयेशा खान सोशल मीडियावर चांगलीच सक्रिय असते. वेगवेगळ्या सण-उत्सवांच्या निमित्ताने ती खास लूकमध्ये फोटो शेअर करत असते. गणेश चतुर्थीनिमित्तही तिने खास मराठमोळा अंदाज निवडला. अभिनेत्रीने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर या लूकमधील काही सुंदर फोटो शेअर केले असून, त्यासोबत "पदरात चांदणं, नजरेत स्वप्नं" असं मराठी कॅप्शन लिहिलं आहे. आयेशाने या खास लूकसाठी सुंदर गोल्डन रंगाची साडी नेसली आहे. साडीला साजेसा मरून रंगाचा ब्लाउज तिने परिधान केला आहे. पारंपरिक आणि मॉडर्न स्टाइलचा मेळ साधत तिने या लूकला ग्लॅमरस टच दिला आहे. तिच्या लूकमधील सर्वात लक्षवेधी गोष्ट म्हणजे मराठमोळी नथ आणि कपाळावरील चंद्रकोर बिंदी. यामुळे तिच्या चेहऱ्यावरील सौंदर्य आणखी खुलून दिसत आहे. केसांचा मेसी अंबाडा बांधून त्याला घुंगरांनी सजवत आ येशाने संपूर्ण लूक अधिक आकर्षक केला आहे. तिच्या या फोटोशूटमध्ये पारंपरिक मराठी सौंदर्याची झलक दिसत असली, तरी तिच्या स्टाइलमध्ये आधुनिक ग्लॅमरही तितकाच जाणवतो.



# 'महाराजा 2' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला?

दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता विजय सेतुपतीचा २०२४ मध्ये प्रदर्शित झालेला 'महाराजा' सिनेमा प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरला होता. निओ-नॉयर ॲक्शन थ्रिलर प्रकारातील या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर दमदार कामगिरी केली. विशेष म्हणजे, ओटीटीवर प्रदर्शित झाल्यानंतरही या सिनेमाला देश-विदेशातील प्रेक्षकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. विजय सेतुपतीने साकारलेली मध्यवर्ती भूमिका प्रचंड गाजली. आता 'महाराजा'च्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. या लोकप्रिय सिनेमाच्या सिक्वेलवर काम सुरू असून, खुद्द विजय सेतुपतीने 'महाराजा २'बाबत मोठी अपडेट दिली आहे. त्यामुळे या सिनेमाच्या दुसऱ्या भागाची प्रतीक्षा करणाऱ्या चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढली आहे. 'महाराजा'ची कथा चेन्नईतील एका न्हाव्याभोवती फिरते. चोरीला गेलेली कचऱ्याची बादली परत मिळवण्यासाठी विजय सेतुपतीने साकारलेलं पात्र पोलीस ठाण्यात धाव घेतं. सुरुवातीला अगदी साधी वाटणारी ही घटना पुढे जाताना एका गुंतागुंतीच्या आणि थरारक कथानकाचं रूप धारण करते. सिनेमातील उत्कंठावर्धक पटकथा, अनपेक्षित वळणं आणि क्लायमॅक्सने प्रेक्षकांना खिळवून ठेवलं होतं. विशेषतः सिनेमाचा शेवट अनेकांसाठी धक्कादायक आणि अनपेक्षित ठरला.

# 'बिग बॉस 20'मध्ये सलमान खानची तब्येत बिघडली

बॉलिवूडचा सुपरस्टार सलमान खानच्या 'बिग बॉस 20'मधील विकेंड का वारची सध्या चांगलीच चर्चा रंगली आहे. नुकतेच प्रदर्शित झालेल्या एपिसोड दरम्यान, त्याला अचानक छातीत दुखू लागल्याने चाहते आणि स्पर्धक चिंतेत पडले होते. त्याने सेटवर डॉक्टरांना बोलावण्यास सांगितले, त्याच्या या अवस्थेमुळे सर्वांचीच चिंता वाढली होती. आता सलमानने स्वतः आपल्या प्रकृतीबाबत माहिती दिली आहे. सलमानने पोस्ट करत लिहिले की, "देवाच्या कृपेने, माझ्या प्रकृतीबाबत कोणतीही समस्या नाही. 'बिग बॉस 20'चा प्रोमो या पद्धतीने एडिट करायला नको हवा होता. अशा प्रकारे एडिट केल्याने त्याचा संपूर्ण अर्थ बदलतो. मी तेच केले आहे, जे काझी तौकीरने घरात केले होते. त्या वेदना दाखवण्यामागचा उद्देश केवळ काझीला समजावून सांगण्याइतकाच होता. काझीने जे केले म्हणजेच मनोरंजनासाठी आपल्या आरोग्याचा वापर करणे ते चुकीचे होते, हे त्याला दाखवून देणे हाच माझा एकमेव उद्देश होता. कारण घरातील इतर 15 सदस्यांना तो केवळ अभिनय करत आहे याची कल्पना नव्हती आणि ते त्याच्या प्रकृतीबद्दल खरोखरच चिंतेत होते. प्रोमो ज्या प्रकारे एडिट केला गेला, त्याबद्दल मी माफी मागतो,"



असं सलमान खानने आपल्या पोस्टद्वारे स्पष्ट केलं. यासोबतच, सलमानने बिग बॉसचे आभार मानणारी आणखी एक पोस्ट शेअर केली. या पोस्टमध्ये सलमान खानने लिहिले, "बिग बॉसने परिस्थिती सावरली. धन्यवाद, बिग बॉस." आता यावरुन हे स्पष्ट झाले आहे की सलमान खान पूर्णपणे ठीक आहे. काझीला धडा शिकवण्यासाठी आणित्याला परिस्थितीची जाणीव करून देण्यासाठी त्याने केवळ आजारी असल्याचे नाटक केले होते. याशिवाय 'बिग बॉस 20'च्या विकेंड का वारमध्ये सलमान खानने ट्रोलर्सना फटकारलं. यावेळी त्याने संतापून आपला शर्ट काढला आणि जे ट्रोलर्स त्याच्या वयावरुन टीका करतात त्यांना अभिनेत्याने भरकार्यक्रमात सडेतोड उत्तर दिलं. तसेच सलमान खानने अभिनेत्री कतरिना कैफला तिच्या प्रेग्नंसी नंतरच्या लूकवरुन ट्रोल करणाऱ्यांनाही खडेबोल सुनावले. सलमान खानने आपल्या स्पष्टीकरणातून चाहत्यांच्या मनातील गैरसमज दूर केला आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे 'बिग बॉस २०'च्या घरातील घडामोडी पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आल्या आहेत. सलमानच्या स्पष्टीकरणानंतर चाहत्यांनीही सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

# मोहम्मद सिराजची कर्णधारपदी निवड

## रणजी करंडक स्पर्धेत हैदराबादचे नेतृत्व; सी.व्ही. मिलिंद यांची उपकर्णधारपदी नियुक्ती

**महाईन्यूज | हैदराबाद**

**आगामी रणजी करंडक हंगामातील पहिल्या दोन सामन्यांसाठी मोहम्मद सिराज हैदराबाद संघाचे नेतृत्व करेल, तर सी.व्ही. मिलिंद यांची संघाच्या उपकर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती हैदराबाद क्रिकेट असोसिएशनने प्रसिद्धीपत्रकाव्दारे दिली आहे.**




हैदराबादच्या संघात अनुभवी फलंदाज तन्मय अग्रवाल आणि राहुल सिंग यांच्यासह यष्टिरक्षक-फलंदाज राहुल रादेश आणि साई रेड्डी यांचा समावेश आहे. १५ सदस्यांच्या या संघात तनाय त्यागराजन, अनिकेत रेड्डी आणि अजय देव गौड यांचाही समावेश आहे. सिराजने या फॉरमॅटमध्ये भारतासाठी शेवटचा सामना या वर्षीच्या फेब्रुवारीमध्ये खेळला होता.

भारतीय वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजने अलीकडेच कबूल केले की, दोन महिन्यांच्या विश्रांतीनंतर श्रीलंकेच्या दौऱ्यावर त्याला आपला वेग आणि लय (रिदम) पुन्हा मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागला; मात्र, दुलीप करंडक स्पर्धेत दीर्घ स्पेलमध्ये गोलंदाजी केल्यामुळे त्याला पुन्हा लय मिळवण्यास मदत झाली. श्रीलंकेविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत सिराज त्याच्या नेहमीच्या लयीत दिसला नाही. त्याला लय सापडली नाही आणि त्याच्या गोलंदाजीचा वेगही लक्षणीयरीत्या कमी झाला होता. या मालिकेत सिराजने चार डावांत मिळून केवळ ४४ षटके गोलंदाजी केली होती.

हैदराबादच्या संघात सिराजच्या समावेशामुळे संघाच्या गोलंदाजी आक्रमणाला मोठी मजबुती मिळणार आहे. देशांतर्गत क्रिकेटमध्ये पुन्हा खेळताना सिराजला आपली गोलंदाजी अधिक प्रभावी करण्याची संधी मिळणार आहे. दीर्घ स्पेलमध्ये गोलंदाजी करताना त्याला आपला वेग, स्विंग आणि अचूकता यावर पुन्हा काम करता येईल. हैदराबादकडून खेळताना त्याच्याकडून संघाला महत्त्वपूर्ण योगदानाची अपेक्षा असेल. अनुभवी खेळाडू म्हणून त्याची उपस्थिती इतर युवा गोलंदाजांसाठीही मार्गदर्शक ठरू शकते. आगामी सामन्यांमध्ये सिराजच्या कामगिरीकडे क्रिकेट चाहत्यांचे विशेष लक्ष असणार आहे. दुलीप करंडकानंतर देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याचा हा सहभाग त्याच्या पुढील आंतरराष्ट्रीय तयारीच्या दृष्टीनेही महत्त्वाचा मानला जात आहे.


### सिराज दोन सामन्यांत करणार नेतृत्व

सिराज वेस्ट इंडिजविरुद्धच्या मालिकेसाठी भारताच्या एकदिवसीय (ODI) संघात आहे; तीन सामन्यांची ही मालिका ३ ऑक्टोबर रोजी न्यू चंदीगड येथे संपणार आहे. हैदराबादचा रणजी करंडक स्पर्धेतील पहिला सामना ११ ऑक्टोबर रोजी त्रिपुरा विरुद्ध होणार आहे, मात्र त्याचे ठिकाण अद्याप निश्चित झालेले नाही. त्यांचा पुढील सामना १८ ऑक्टोबर रोजी विजयनगरम येथे आंध्र विरुद्ध सुरू होईल. भारताचा न्यूझीलंड दौरा २२ ऑक्टोबरपासून सुरू होत आहे, मात्र या दौऱ्यावर सुरुवातीला टी-२० मालिका खेळली जाणार आहे.

# ‘इलावेनिल’चा डबल ‘सिल्वर’ धमाका! भारताचा जपानमध्ये डंका

**महाईन्यूज | आयची-नागोया**

**भारताची आघाडीची नेमबाज इलावेनिल वलारिवन हिने आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये अभूतपूर्व कामगिरी नोंदवत दुहेरी रौप्यपदकाला गवसणी घातली आहे. रविवारी (२० सप्टेंबर) जपानमधील आयची-नागोया येथे पार पडलेल्या या क्रीडा महोत्सवात तिने महिलांच्या १० मीटर एअर रायफल सांघिक प्रकारासह वैयक्तिक स्पर्धेतही चमकदार कामगिरीचे प्रदर्शन करत भारताला दोन रौप्यपदके मिळवून दिली.**




इलावेनिलने कनिष्ठ (ज्युनियर) पातळीवरही नेत्रदीपक कामगिरी नोंदवली. २०१८ मधील आयएसएसएफ ज्युनियर विश्वचषक स्पर्धेत तिने महिलांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात सुवर्णपदक पटकावले होते. याच स्पर्धेत तिने मिश्र सांघिक गटातही सुवर्णपदकावर मोहर उमटवली. या घवघवीत यशानंतर त्यांनी वरिष्ठ पातळीवरही यशाची परंपरा कायम राखत आयएसएसएफ विश्वचषक, विश्वचषक अंतिम फेरी आणि आशियाई नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत पदकांची लयलूट केली.

आपल्या कारकीर्दीतील सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर इलावेनिलने महिलांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात जागतिक क्रमवारीत अग्रस्थान (वर्ल्ड नंबर-१) पटकावले होते. आज भारताच्या अग्रगण्य रायफल नेमबाजांमध्ये तिची गणना होते. आयएसएसएफच्या नोंदींनुसार, त्यांच्या नावे जागतिक अजिंक्यपद स्पर्धा, विश्वचषक, विश्वचषक अंतिम फेरी आणि आशियाई अजिंक्यपद स्पर्धा अशा विविध स्तरांवरील अनेक मानाच्या पदकांची नोंद आहे.

इलावेनिलने २०२० च्या टोकियो ऑलिम्पिकमधून ऑलिम्पिक स्पर्धेत पदार्पण केले होते. तेथे महिलांच्या १० मीटर एअर रायफल पात्रता फेरीत त्यांना १६ व्या, तर मिश्र सांघिक प्रकारात १२ व्या स्थानावर समाधान मानावे लागले. त्यानंतर २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये तिने महिलांच्या १० मीटर एअर रायफल पात्रता फेरीत १० वे स्थान मिळवले, तर भारतीय मिश्र संघासोबत त्या १२ व्या स्थानी राहिल्या. ऑलिम्पिक पदकाचे स्वप्न जरी अधुरे राहिले असले, तरी आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक मोठ्या स्पर्धा जिंकून त्यांनी आपली क्षमता सातत्याने सिद्ध केली आहे.

इलावेनिलच्या कारकीर्दीत संघर्षाचा टप्पाही आला. गुडघा आणि पाठीच्या गंभीर दुखापतींचा सामना करावा लागल्यानंतरही त्यांनी दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर नेमबाजीच्या पटलावर दिमाखदार पुनरागमन केले. तिच्या या पुनरागमनात प्रशिक्षक नेहा चव्हाण आणि ऑलिम्पिक पदकविजेते गगन नारंग यांच्या मार्गदर्शनाची अत्यंत महत्त्वाची भूमिका ठरली. २०१४ मध्ये ‘गन फॉर ग्लोरी’ अकादमीत दाखल होऊन तिने नेहा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सराव सुरू केला होता, तर गगन नारंग यांनी तिला वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. सांघिक यशानंतर इलावेनिलने वैयक्तिक १० मीटर एअर रायफल प्रकाराच्या अंतिम फेरीतही उत्कृष्ट निशाणा साधत २५२.४ गुणांसह रौप्यपदक पटकावले. जपानच्या हिनाता ताइची हिने २५३.० गुणांसह या प्रकारातील सुवर्णपदक स्वतःच्या नावे केले.

### इलावेनिल वलारिवनचा क्रीडा प्रवास

२ ऑगस्ट १९९९ रोजी तामिळनाडूमध्ये जन्मलेल्या इलावेनिल १० मीटर एअर रायफल प्रकारात आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करतात. आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा महासंघाच्या (आयएसएसएफ) नोंदींनुसार, त्यांनी २०१४ मध्ये नेमबाजीला सुरुवात केली असून नेहा चव्हाण या त्यांच्या प्रशिक्षक आहेत. इलावेनिलने इंग्रजी विषयातून पदवी (बी.ए.) संपादन केली आहे. नेमबाजीकडे वळण्यापूर्वी त्यांनी अॅथलेटिक्स, ज्युडो, बॅडमिंटन, हँडबॉल आणि कबड्डी यांसारख्या विविध खेळांमध्येही स्वतःला आजमावून पाहिले होते.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। सोमवार ।
दि. 21 सप्टेंबर 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# शहरात १७ हजार ५०० अनधिकृत नळजोड

## पिंपरी-चिंचवड महापालिकेची ठेकेदारामार्फत शोधमोहीम; मीटर बसविण्यासाठी २६ कोटींचा खर्च

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत नळजोड नियमित करण्यासाठी राबविलेल्या विशेष मोहिमेला अल्प प्रतिसाद मिळाल्यानंतर महापालिकेने ठेकेदारामार्फत नळजोड शोध मोहीम हाती घेतली. आत्तापर्यंत 17 हजार 500 अनधिकृत नळजोड आढळून आले आहेत. त्यांपैकी 13 हजार 500 नळजोड नियमित करून पाणी मीटर बसविण्यात आले असून, त्यासाठी 26 कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. शहरात 25 हजारांहून अधिक नळजोड अनधिकृत असल्याचा प्रशासनाचा अंदाज असून, या कामासाठी एकूण 32 कोटी रुपयांचा खर्च करण्यात येणार आहे.**



शहरात सात लाख 84 हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. तर, सुमारे दोन लाख अधिकृत नळजोडधारकांची संख्या आहे. हाऊसिंग सोसायटी एकत्रित नळजोड आणि अनधिकृत नळजोडांमुळे मालमत्तांच्या तुलनेत नळजोडांची संख्या कमी दिसत असल्याचा प्रशासनाचा दावा आहे. शहरात तब्बल 40 टक्के पाण्याची गळती तसेच, पाणीचोरी होत असून, पाणीपट्टीतून अपेक्षित उत्पन्नही मिळत नाही. पाणी गळती, चोरी रोखण्यासाठी आणि उत्पन्न वाढीसाठी महापालिकेने अनधिकृत नळजोड नियमित करण्यासाठी सन 2023 मध्ये विशेष मोहीम राबविली. तीन वेळा मोहिमेला मुदतवाढ दिली. अनामत रक्कमही घेतली नाही. तरीही, नळजोड अधिकृत करण्यास नागरिकांचा प्रतिसाद मिळाला नाही. महापालिकेच्या आठ क्षेत्रीय कार्यालयातून केवळ एक हजार 673 जणांनी नळजोड नियमित करण्यासाठी अर्ज केले.

पाणीपुरवठा विभागाने नळजोड नियमित करण्याचे काम ठेकेदारामार्फत करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार अनधिकृत नळजोड सर्वेक्षण आणि मीटर बसविण्याचे 32 कोटींचे काम डिसेंबर 2024 पासून सुरू केले. कामाची मुदत 24 महिन्यांची आहे. आतापर्यंत शहरातील तीन लाख सात हजार 950 मालमत्तांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. झालेल्या सर्वेक्षणात झोपडपट्टीसह विविध भागात 17 हजार 500 हजार अनधिकृत नळजोड आढळून आले. त्यांपैकी 13 हजार 500 नळजोड अधिकृत करून मीटर बसविण्यात आले आहेत. त्यांना पाणीपट्टीची आकारणी सुरू केली. उर्वरित अनधिकृत नळजोडांची पडताळणी करण्यात येत आहेत. सर्वेक्षणाची मुदत संपण्यास चार महिने बाकी आहेत. चार महिन्याच्या मुदतीत सर्वेक्षण पूर्ण करून घेतले जाणार असल्याचे पाणीपुरवठा भागाने सांगितले.

### पाणीगळती, चोरी रोखण्याचे प्रयत्न

शहराला मावळातील पवना धरणातून 520 एमएलडी, आंद्रा धरणातून 90 एमएलडी , एमआयडीसीकडून 30 एमएलडी असे एकूण असे 640 एमएलडी पाणी दिवसाला दिले जाते. यांपैकी 40 टक्के पाण्याची गळती, चोरी होत असल्याचा पाणीपुरवठा विभागाचा दावा आहे. अधिकृत नळजोड, मीटर बसविल्यानंतर शहरातील पाणीगळती, चोरी कमी होईल. महापालिकेच्या उत्पन्नातही वाढ होईल, असा दावा पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात येत आहे. शहरातील अनधिकृत नळजोडाचे सर्वेक्षण सुरू आहे. झोपडपट्टीसह विविध भागात 17 हजार 500 अनधिकृत नळजोड आढळले आहेत. हे सर्वेक्षण डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. सर्वेक्षणात सापडलेले अनधिकृत नळजोड अधिकृत करून पाणीमीटर बसविण्यात येत आहे.

# शालेय जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत तनिष्का शिंदेचे सुवर्णपदक

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**जलतरण तलाव हॉल, नेहरूनगर (पिंपरी) येथे पार पडलेल्या शालेय जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत लांडेवाडी-भोसरी येथील राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. तनिष्का हरिचंद्र शिंदे हिने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. ५८ किलोग्रॅम वजन गटात तब्बल १३२ किलोग्रॅम वजन उचलून तिने प्रथम क्रमांक पटकावला असून, या चमकदार कामगिरीच्या जोरावर तिची शालेय वेटलिफ्टिंग विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.**



तनिष्का ही इयत्ता १२ वी (वाणिज्य) मध्ये शिकत असून तिने यापूर्वीही राज्य व राष्ट्रीय स्तरावरील वेटलिफ्टिंग स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करून आपल्या खेळाचा ठसा उमटवला आहे. तिला महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गोपीचंद करंडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे.

त्याचप्रमाणे संस्थेचे खजिनदार व पिंपरी-चिंचवड शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष श्री. अजितभाऊ गव्हाणे, संस्थेचे सचिव श्री. सुधीर मुंगसे सर, पिं.चिं. मनपाचे नगरसेवक व संस्थेचे विश्वस्त विक्रांतदादा लांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. जी. कानडे, उपप्राचार्य प्रा. किरण चौधरी, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. नेहा बोरसे, रजिस्ट्रार सौ. अश्विनी चव्हाण, विभाग प्रमुख प्रा. राजू हजारे, प्रा. योगिता बारवकर, प्रा. संगिता गवस यांच्यासह सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तनिष्काचे मनापासून कौतुक केले आहे.



### संस्थेकडून कौतुक व शुभेच्छांचा वर्षाव

तनिष्काच्या या दैदिप्यमान यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा भोसरीचे प्रथम आमदार मा. श्री. विलासराव लांडे साहेब यांनी तिचे विशेष अभिनंदन करून पुढील विभागीय स्पर्धेतील कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या.

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाची हॅटट्रिक

## आमदार विलासराव लांडे यांच्याकडून विजेत्या खेळाडूंचे विशेष अभिनंदन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**अँटिबायोटिक्स स्कूल, पिंपरी येथे नुकत्याच पार पडलेल्या शालेय जिल्हास्तरीय हँडबॉल स्पर्धेत (१९ वर्षांखालील गट) राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय (लांडेवाडी, भोसरी) येथील मुलांच्या संघाने अजोड कामगिरी करत सलग तिसऱ्यांदा प्रथम क्रमांक पटकावला आहे. याच स्पर्धेत महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने चमकदार कामगिरी करत तृतीय क्रमांक मिळवला.**





१८ आणि १९ सप्टेंबर रोजी पार पडलेल्या या स्पर्धेतील मुलांच्या अंतिम सामन्यात राजमाता जिजाऊ महाविद्यालयाच्या संघाने एस.एन.बी.पी. जुनिअर कॉलेज (मोरवाडी, पिंपरी) या संघाचा १९-१३ असा ६ गोलच्या फरकाने पराभव केला. या विजयामुळे प्रथम क्रमांक मिळवलेल्या मुलांच्या संघाची शालेय विभागस्तरीय हँडबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

विजयी संघात कुणाल शिंदे, सुरज ढमढेरे, मुआज खान, मयूर धोत्रे, अथर्व लांडगे, यशराज जाधव, हिमांशू शर्मा, विश्वजीत ओव्हाळ, मयूरेश जाधव, सुरज बुरुड, यश शिंदे, अमन शेख, रवींद्र गायकवाड, ओंकार ढवळे, विराज खोपडे व शिवराज गव्हाणे या खेळाडूंचा समावेश होता. या सर्व खेळाडूंना कनिष्ठ महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गोपीचंद करंडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

खेळाडूंच्या या दैदीप्यमान यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व भोसरीचे प्रथम आमदार मा. श्री. विलासराव लांडे यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे विशेष अभिनंदन करून पुढील विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

तसेच संस्थेचे खजिनदार व राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष श्री. अजितभाऊ गव्हाणे, सचिव श्री. सुधीर मुंगसे, पिं. चिं. मनपा नगरसेवक व विश्वस्त विक्रांतदादा लांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. जी. कानडे, उपप्राचार्य प्रा. किरण चौधरी, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. नेहा बोरसे, रजिस्ट्रार सौ. अश्विनी चव्हाण, विभाग प्रमुख प्रा. राजू हजारे, प्रा. योगिता बारवकर, प्रा. संगिता गवस व सर्व प्राध्यापक वर्ग आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

### "खेळाडूंचे यश अभिमानास्पद!"

"राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे विद्यार्थी शैक्षणिक गुणवत्तेसोबतच क्रीडा क्षेत्रातही अव्वल कामगिरी करत आहेत, याचा मला सार्थ अभिमान आहे. मुलांच्या संघाने सलग तिसऱ्यांदा विजेतेपद पटकावून केलेली 'हॅटट्रिक' आणि मुलींच्या संघाने मिळवलेले यश हे खेळाडूंची जिद्द, कठोर परिश्रम आणि प्रा. गोपीचंद करंडे यांच्या उत्तम मार्गदर्शनाचे फलित आहे. विजेता मुलांचा संघ विभागस्तरीय स्पर्धेतही अशीच सर्वोत्तम कामगिरी करून संस्थेचा व भोसरीचा नावलौकिक वाढवेल, असा मला पूर्ण विश्वास आहे. सर्व खेळाडूंचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी उदंड शुभेच्छा!"

# आर. के. एल. गॅलक्सी इंटरनॅशनल स्कूलचे आंतरशालेय नाट्य व नृत्य स्पर्धेत सुवर्णयश

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शनिवार, १९ सप्टेंबर २०२६ रोजी एल्प्रो मॉल येथे पार पडलेल्या भव्य आंतरशालेय नाट्य आणि नृत्य स्पर्धेत आर. के. एल. गॅलक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या चमकदार कामगिरीने बाजी मारली आहे. शहराभरातील अनेक नामांकित शाळांच्या चुरशीच्या स्पर्धेत या विद्यार्थ्यांनी उत्तम कलागुणांचे प्रदर्शन करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.**






या स्पर्धेत आर. के. एल. गॅलक्सीच्या नृत्य संघाने अत्यंत लयबद्ध, आकर्षक आणि कलात्मक नृत्याचे सादरीकरण करत प्रेक्षकांची मने जिंकली. त्यांच्या या बहारदार सादरीकरणाला न्यायाधीशांनी दाद देत 'प्रथम उपविजेतेपद' (फर्स्ट रनर-अप) देऊन गौरवण्यात आले.

दुसरीकडे, शाळेच्या नाट्य संघाने एका आशयघन आणि प्रभावी नाटकाचे सादरीकरण करून संपूर्ण नाट्यगृह जिंकून घेतले. कलाकारांचा अभिनय आणि संवादातील ताकदीच्या जोरावर या नाटकाने या स्पर्धेतील सर्वात प्रतिष्ठित 'सर्वोत्कृष्ट नाटक पुरस्कार' (बेस्ट ड्रामा अवॉर्ड) आपल्या नावावर केला.

विद्यार्थ्यांच्या या अद्वितीय यशाबद्दल शाळा व्यवस्थापन, प्राचार्य आणि शिक्षकवृंदाने अत्यंत अभिमान व्यक्त केला आहे. विद्यार्थ्यांचे परिश्रम, त्यांची कलेप्रती असलेली निष्ठा आणि मार्गदर्शक शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यांमुळेच हे यश शक्य झाल्याचे सांगत शाळेतर्फे सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक करण्यात आले.

"आमच्या विद्यार्थ्यांचे हे यश अत्यंत अभिमानास्पद आणि कौतुकास्पद आहे. कला, नाटक आणि नृत्याच्या क्षेत्रात त्यांनी दाखवलेली सर्जनशीलता आणि मेहनत खरोखरच वाखाणण्याजोगी आहे. अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देणे आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे. या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांचे अथक परिश्रम आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांच्या समर्पणाला जाते. सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन!"

- डॉ.पुष्कर चौबे ( CEO )
आर. के. एल. गॅलक्सी इंटरनॅशनल स्कूल.


D Y PATIL
INTERNATIONAL
UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform
SHAPE YOUR FUTURE.
LEAD WITH JUSTICE.
B.A. LL.B. (Hons.)
&
B.B.A. LL.B. (Hons.)
INTEGRATED 5 YEAR PROGRAMS
Build a Strong
Foundation in Law.
Make an Impact.
Create Change.
ADMISSION
OPEN
2026
School of
Legal Studies
Experienced
Faculty
Moot Court &
Practical Training
Global Exposure &
Collaborations
Legal Aid
Support
APPROVED BY
BAR COUNCIL
OF INDIA
+91-8600091180
admission@dypiu.ac.in
www.dypiu.ac.in
Apply
Now